बालकांना आजीवन धोका

तापमानवाढीचा फटका भारतीयांना बसणार असल्याचा 'लॅन्सेट'चा अहवाल

पृथ्वी रक्षण

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

वैश्विक तापमानवाढीमुळे हवामानात होत असलेल्या बदलांचा सर्वाधिक फटका जगभरातील विशेषतः भारतीय बालकांना अधिक प्रमाणात बसेल, असे 'लॅन्सेट' या विज्ञानपत्रिकेतील एका अहवालात म्हटले आहे. जीवाश्म इंधनाचा वापर तातडीने कमी न केल्यास पुढील पिढ्यांना अन्नाचा तुटवडा, रोगांचा वाढता संसर्ग, पूर, जीवघेण्या उष्णतेच्या लाटा यांना तोंड द्यावे लागू शकते, असे अहवालात म्हटले आहे.

आरोग्य आणि हवामानातील बदल या विषयावर 'लॅन्सेट'मध्ये दर वर्षी व्यापक मूल्यमापन अहवाल प्रसिद्ध केला जातो. हे मूल्यमापन ४१ प्रमुख निर्देशांकांच्या आधारे करण्यात येते. सध्याच्या नुसारच जगातील कार्बन उत्सर्जन आणि हवामानातील बदल अशाच गतीने सुरू राहिल्यास आज जन्माला येणारी बालके ७१ वर्षांची होतील, तेव्हा जगाचे तापमान ४ अंश सेल्सिअसने वाढलेले असेल. त्यामुळे त्यांच्या जीविताला प्रत्येक टप्प्यावर धोका असेल, अशी भीती या अहवालात वर्तविण्यात आली आहे. जगभरातील ३५ संस्थांतील १२० तज्ज्ञ एकत्र येऊन हा अभ्यास करतात आणि अहवाल तयार करतात. यामध्ये जागतिक बँक आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रतिनिधींचाही समावेश असतो.

हवामानातील बदलांचा फटका आताच जगभरातील बालकांना बसतो आहे. पॅरिस करारात ठरल्यानुसार तापमानवाढ दोन अंशांपर्यंत मर्यादित न ठेवल्यास भावी पिढ्यांचे आरोग्य उत्तम स्थितीत राहणे कठीण आहे, असेही अहवालात म्हटले आहे.

'अहवालात हवामानातील बदलांचा सर्वच वयोगटातील व्यक्तींच्या प्रकृतीवर होणारा परिणाम अभ्यासण्यात आला आहे. मात्र, बालकांच्या प्रकृतीवर होणाऱ्या परिणामांवर विशेष भर देण्यात आला आहे. कारण, या विषयावर तातडीने कार्यवाही होण्याची गरज आहे,' असे या अहवालाच्या सहलेखिका पौर्णिमा प्रभाकरन यांनी सांगितले.

> **वैश्विक तापमानवाढीचा सर्वाधिक फटका अर्भके आणि बालकांना बसेल. कुपोषण आणि त्याच्याशी संबंधित आरोग्य समस्या उदा. वाढ खुरटणे, कमकुवत रोगप्रतिकार शक्ती, वाढीतील दीर्घकालीन समस्या आदी उद्‌भवू शकतात. डेंगीसारख्या आजारांची लागण बालकांना लवकर होईल. फुफ्फुसांची क्षमताच क्षीण झाल्यामुळे दम्यासारखे आजार आणि त्यातून हृदयविकार, पक्षाघाताचा धोका वाढेल.**
> – 'लॅन्सेट'चा अहवाल

भारतालाच सर्वाधिक फटका का?
- भारताची लोकसंख्या अवाढव्य असून, आपल्याकडे गरिबी, कुपोषण आणि आरोग्यविषयक गैरसोयी अधिक

फटका कसा बसेल?
- उष्णतेच्या तीव्र लाटांमुळे बालकांना अतिसाराची लागण झपाट्याने होईल.
- सध्या अतिसार हे बालमृत्यूचे एक प्रमुख कारण
- २०१५मध्ये उष्माघातामुळे भारतात हजारो जणांचे बळी
- गेल्या ५० वर्षांत आरोग्याच्या क्षेत्रात जे काही कमावले ते काही वर्षांतच गमावण्याची भीती
- भविष्यात तापमानवाढीमुळे पिकांअभावी अन्नसुरक्षा धोक्यात येण्याची भीती

उद्दिष्टपूर्ती कशी होईल
- वैश्विक तापमानवाढ १.५ अंशांपर्यंतच रोखणे हे जागतिक उद्दिष्ट
- ते साध्य करण्यासाठी २०१९ ते २०५० या काळात जीवाश्म इंधनाच्या ज्वलनातून कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण दर वर्षी ७.४ टक्क्यांनी कमी करण्याखेरीज पर्याय नाही.

दिल्लीतील हवेचा दर्जा खराबच

नवी दिल्ली : नवी दिल्लीतील हवेचा दर्जा गुरुवारीही चिंताजनक पातळीवरच होता. येथील हवेच्या दर्जाचा निर्देशांक (एअर क्वालिटी इंडेक्स) ४६० वर होता.

द्वारका सेक्टर ८ येथील हवा तपासणी केंद्रात एक्यूआयची नोंद ४९६ इतकी उच्चांकी झाली. नेहरूनगर आणि जवाहरलाल नेहरू स्टेडियम परिसरात एक्यूआय ४९२ होता. बुधवारी दिल्लीतील एक्यूआय ४५६ नोंदविण्यात आला होता. गुरुवारी त्याच वाढच झाली. पर्यवरण प्रदूषण प्राधिकरणाने दिल्ली व राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील हॉट मिक्स प्रकल्प, स्टोन क्रशर आदींवर १५ नोव्हेंबरपर्यंत बंदी घातली आहे.

इटलीतील व्हेनिसमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून, जनजीवन विस्कळित झाले आहे. सेंट मार्क्स स्क्वेअरमधील हे दृश्य.

कोळशामुळे पाच लाख बळी

नवी दिल्ली : हवेच्या प्रदूषणामुळे भारतात २०१६मध्ये पाच लाख जणांचा अकाली मृत्यू झाला आहे. त्यात कोळसा ज्वलनामुळे झालेल्या प्रदूषणाला बळी पडलेल्यांची संख्या ९७ हजार आहे, असे 'लॅन्सेट'च्या अहवालात म्हटले आहे. कोळशाचा वापर तातडीने कमी करून तो लवकरात लवकर थांबवायला हवा, अशी शिफारस करण्यात आली आहे.

'भारतात २०१६ ते २०१८ या काळात कोळशामुळे होणारे प्रदूषण ११ टक्क्यांनी वाढले आहे. कोळसा जाळल्यामुळे हवेतील २.५ मायक्रॉनपेक्षा कमी आकाराच्या कणांची संख्या वाढते. हे कण थेट फुफ्फुसांपर्यंत पोहोचतात,' असे अहवालात म्हटले आहे.

उत्तर प्रदेशामध्ये तिहेरी तलाक

वृत्तसंस्था, मुजफ्फरनगर

दोन मुलींनंतर तिसऱ्यांदाही मुलीचा गर्भ असल्याची माहिती झाल्यानंतर पतीने पत्नीला गर्भपात करण्याचा सल्ला दिला; मात्र पत्नीने गर्भपातास नकार दिल्यानंतर पतीने तीन वेळा तलाक म्हणून पत्नीला घटस्फोट दिल्याचा प्रकार मुजफ्फरनगर येथील चप्रा भागात घडला असल्याची माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली.

फर्जाना असे पत्नीचे नाव असून, गर्भतपासणीमध्ये तिला मुलगीच होणार असल्याचे माहिती झाल्यानंतर पती गालिबने तिला गर्भपात करण्यास सांगितले. फर्जाना यांना आधी दोन मुली असल्याने गालिबला तिसऱ्यांदा मुलगी नको होती; परंतु फर्जाना यांनी गर्भपात करण्यास नकार दिल्यानंतर चिडलेल्या गालिबने तीन वेळा तलाक म्हणून त्यांना घटस्फोट दिला. फर्जाना आणि गालिब यांच्या लग्नाला तीन वर्षे झाली आहेत.

या प्रकरणी गालिबसह त्याच्या धरातील नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये गालिबच्या आईचाही समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

गुजरातच्या सीमेवरील १६ चेक पोस्ट बंद

सुलभ व्यवसायासाठी सरकारचा निर्णय

वृत्तसंस्था, गांधीनगर

गुजरातच्या सीमेवर असलेले १६ आरटीओ वाहन तपासणी चौक्या (चेक पोस्ट) २० नोव्हेंबरपासून बंद करण्याचा निर्णय गुजरात सरकारने गुरुवारी जाहीर केला. भ्रष्टाचारावर आळा, वाहतूककोंडी कमी करणे आणि सुलभ व्यवसाय करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

'या सीमेवरील चेकपोस्टमध्ये सद्यस्थितीत कर्मचाऱ्यांकडून तपासणी आणि कर जमा केला जात आहे. आता या ठिकाणी कर जमा करण्यासाठी आणि सवलत शुल्कासाठी ऑनलाइन यंत्रणा बसवण्यात येणार आहे,' असे मुख्यमंत्री विजय रुपाणी यांनी सांगितले. ऑनलाइन यंत्रणेमुळे या चेक पोस्टवर होणाऱ्या वाहतूककोंडीचा प्रश्न मिटेल आणि वाहतुकीचा वेळ कमी झाल्याने उत्पादकताही वाढेल, असेही ते म्हणाले. गुजरात राज्यात महाराष्ट्र, राजस्थान आणि मध्य प्रदेशलगतच्या सीमेवर १६ आरटीओ चेक पोस्ट आहेत. जवळपास ९० लाख वाहने येथून जातात. आता कर आणि सवलत शुल्क केवळ ऑनलाइन यंत्रणेद्वारे स्वीकारले जाईल. यामुळे भ्रष्टचारालाही चाप बसेल.

व्यवसाय सुलभीकरणाच्या दिशेने असा निर्णय घेणारे गुजरात हे कदाचित पहिले राज्य असावे, असे रुपाणी म्हणाले. या चेक पोस्टमधून राज्य सरकारला प्रति वर्षी ३३२ कोटी महसूल मिळतो, अशी माहितीही त्यांनी दिली. जर वाहतूकदाराला कर किंवा शुल्क ऑनलाइन भरण्यास अडचण आली तर तो जवळच्या आरटीओ कार्यालयात जाऊन त्याचा भरणा करू शकतो.

महाभियोग हा खोटारडेपणा

कारवाईस परवानगी देणे चुकीचे असल्याचे ट्रम्प यांचे मत

वृत्तसंस्था, वॉशिंग्टन

डोनाल्ड ट्रम्प

डेमॉक्रॅट्सचे प्राबल्य असणाऱ्या अमेरिकी प्रतिनिधीगृहामध्ये आपल्याविरोधात महाभियोग चालवला जाणे हा खोटारडेपणा असून, त्यासाठी अजिबात परवानगी देता कामा नये, अशी आगपाखड अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे.

या संदर्भातील सुनावणीस बुधवारी सुरुवात झाली. युक्रेनचे काळजीवाहू राजदूत विल्यम टेलर आणि युरोपीयन आणि युरेशियन देशांची जबाबदारी असलेले परराष्ट्र खात्याचे उपमंत्री जॉर्ज केंट या दोघांची चौकशी समितीसमोर पाच तासांहून अधिक काळ चौकशी झाली. स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असणारे डेमॉक्रॅट नेते जो बायडेन आणि त्यांचे पुत्र हंटर यांच्यावरील कारवाईसाठी युक्रेनच्या अधिकाऱ्यांवर दबाव आणल्याचा ट्रम्प यांच्यावर आरोप आहे. हंटर हे युक्रेनमधील एका गॅस कंपनीच्या संचालक मंडळावर आहेत.

'हा सारा प्रकार निव्वळ खोटारडेपणा असून त्यासाठी अनुमती नाकारली पाहिजे, असे ट्रम्प यांनी व्हाइट हाउसमध्ये आयोजित केलेल्या तुर्कस्थानचे अध्यक्ष एर्डोगन यांच्यासोबत झालेल्या संयुक्त पत्रपरिषदेत सांगितले. आपण दिवसभर एर्डोगन यांच्यासोबत बैठकीत व्यग्र असल्याने सुनावणीचे कामकाज पाहू शकलो नाही, असे ट्रम्प म्हणाले. एका पत्रकाराने सुनावणीबाबत विचारले असता, 'तुम्ही कशाबद्दल बोलताय, मला वाटलं की ते प्रकरण म्हणजे एक विनोद आहे...' असे म्हणून त्यांनी तो विषय उडवून लावला. 'मात्र या संदर्भात मुद्दे उपस्थित करणारा जो कोण जागल्या आहे, त्याबद्दल मात्र मला उत्सुकता आहे. ही जी कुणी व्यक्ती आहे, तिने माझ्या जुलैमधील फोनवरील संभाषणाबाबत अत्यंत चुकीची माहिती दिल्याचा दावा ट्रम्प यांनी केला. शुक्रवारी या फोनवरील संभाषणाबाबतची माहिती आपण प्रसिद्ध करणार आहोत, असेही ट्रम्प म्हणाले.

'सम-विषम'च्या विरोधात गोयल यांचे आंदोलन

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

दिल्लीतील प्रदूषणाच्या वाढत्या पातळीच्या पार्श्वभूमीवर खासदार विजय गोयल यांनी गुरुवारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या 'सम-विषम' योजनेविरोधात निषेध व्यक्त करून आंदोलन केले.

'सम-विषम योजना अजिबात चांगली नाही, ती लागू केल्यानंतर दिल्लीची अवस्था 'गॅस चेंबर'सारखी झाली आहे. आता हेच केजरीवाल पिकांची खोड जाळली म्हणून प्रदूषण होत असल्याचा खोटा दावा करीत आहेत,' अशी टीका गोयल यांनी केली. गेल्या आठवड्यात 'सम-विषम'चा नियम तोडल्यामुळे गोयल यांना चार हजार रुपये दंड करण्यात आला. त्यानंतर संतप्त झालेल्या गोयल यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात निषेधाचे फलक घेऊन आंदोलन केले. 'प्रदूषण की जिम्मेदार केजरीवाल सरकार, ऑड-इव्हन है बेकार' अशा आशयाचे फलक घेऊन त्यांनी निषेध व्यक्त केला.

मुख्यमंत्री केजरीवाल यांनी बुधवारी दिल्लीशेजारील हरियाणा आणि पंजाब या राज्यांत पिके जाळल्यामुळे प्रदूषण होत असल्याचा आरोप केला होता; तसेच या दोन्ही राज्यांनी पिके न जाळण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश धुडकावला असल्याचेही केजरीवाल यांनी म्हटले होते. 'पाच वर्षांनंतरही केजरीवाल यांनी दिल्लीतील प्रदूषण पातळी रोखण्यासाठी कोणतेही उपाय केले नाहीत. आता ते सम-विषम योजना राबवित आहेत. मी या योजनेच्या विरोधात आहे.

विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केजरीवाल यांनी ही योजना आणली असून, मी याच्या विरोधात आहे,' असेही गोयल यांनी म्हटले आहे. सम-विषम योजना चार नोव्हेंबरपासून दिल्लीत लागू करण्यात आली. ती १५ नोव्हेंबरपर्यंत होती. गरज असेल तर केजरीवाल यांनी पुन्हा ही योजना वाढविण्याचे ठरविले आहे.

जम्मूमध्ये उद्यापासून 'गुड गव्हर्नन्स' परिषद

जम्मू : जम्मू-काश्मीर आणि लडाख या नवनिर्मित केंद्रशासित प्रदेशांतील २०० हून अधिक अधिकाऱ्यांसाठी 'गुड गव्हर्नन्स'विषयी दोन दिवसांची परिषद आयोजिण्यात आली आहे. परिषदेचे उद्‌घाटन केंद्रीय मंत्री जितेंद्रसिंह यांच्या हस्ते होणार आहे. जम्मूतील कन्व्हेन्शन सेंटर येथे १५ व १६ नोव्हेंबर रोजी ही परिषद होईल. ३१ ऑक्टोबर रोजी या दोन्ही राज्यांना केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला. परिषदेत सहभागी होणाऱ्या २२३ अधिकाऱ्यांपैकी पाच आयएएस अधिकारी आहेत.

जाहीर नोटीस

(फ्लॅट नं. २०३, मुळे आर्केड को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., सिटी सर्व्हे नं. १५३७, सदाशिव पेठ, पुणे या मिळकतीबाबत)

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका-पुणे शहर, मे. सब-रजिस्ट्रारसाहेब हवेली यांच्या हद्दीतील तसेच पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील पुणे पेठ सदाशिव येथील सिटी. एस. नं. १५३७ या मिळकतीवर बांधलेल्या **'मुळे आर्केड को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.'** या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील **फ्लॅट नं.२०३ यांसी बिल्ट-अप क्षेत्र ६०० चौ. फुट म्हणजेच ५५.७४ चौ. मीटर्स** हा फ्लॅट **श्री. शेखर आनंद पेठे यांनी ओनरशिप पध्दतीने विकत घेतलेला असून श्री. शेखर आनंद पेठे** यांना सदरील फ्लॅटमध्ये प्राप्त झालेले हक्क, हितसंबंध (राईट, टायटल अ‍ॅण्ड इंटरेस्ट) तसेच ममुळे आर्केड को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.फ या सोसायटीच्या सभासदत्वाच्या हक्कासह त्यांनी आमच्या अशिलांच्या नावे असाईन/ट्रान्सफर करण्याचे मान्य व कबूल केलेले असून सदरील फ्लॅट मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खात्री व भरंवसा श्री. शेखर आनंद पेठे यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी सदरील फ्लॅट मिळकतीमध्ये कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, ताबा वा अधिकार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **आठ (०८) दिवसांचे** मुदतीत खालील पत्त्यावर सर्व अस्सल कागदपत्रांनिशी आमची खात्री करून द्यावी. सदरील मुदतीत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरील फ्लॅट मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कुणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस.

पुणे. तारीख-१३/११/२०१९

sd/-
अशोक छाजेड (अ‍ॅडव्होकेट)
२०४/२०५, पूनम प्लाझा, बँक ऑफ महाराष्ट्रचेवर, मार्केट यार्ड रोड, बिबवेवाडी, पुणे-४११ ०३७. फोन नं. ऑ-२४२७०९८४, २९७००९८४, ७४९८८१२४९६

पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे ४११००५,
महाराष्ट्र
जाहीर सूचना

स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२० सुरु झाले आहे. त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका 5 Star मानांकनासाठी मा. मुख्य सभा ठ. क्र. ३१४, अन्वये दिनांक २८ ऑगस्ट २०१९ रोजी जाहीर करण्यात येत आहे. स्टार रेटिंग साठीचे निकष swachhbharaturban.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या निकषांची पूर्तता पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पुणे शहरातील नागरिकांच्या काही सुचना व हरकती असल्यास पुढील १५ दिवसांत घनकचरा व्यवस्थापन विभाग, पहिला मजला, मनपा मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे येथे कळविण्यात याव्यात.

पुणे शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यास सहकार्य करावे.

जावक क्र. : | **स्वाक्षरी/-**
दिनांक : Seal **महापालिका आयुक्त**
ठिकाण: | **पुणे महानगरपालिका**

पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, ४११००५ पुणे,
महाराष्ट्र
जाहीर सूचना

(सेप्टिक टँक स्वच्छतेसाठीच्या वाहनांसाठी सेवाशुल्क देणेबाबत)

पुणे महानगरपालिका मा. स्थायी समिती ठराव क्र. १९६०, दिनांक ३१/१/२००० अन्वये कचरा वाहतूक विभागाकडून सेप्टिक टँक स्वच्छतेसाठी महानगरपालिकेकडून पुरविल्या जाणाऱ्या वाहनांना सेवा शुल्क देणे बंधनकारक आहे. यासाठी आकारण्यात येणारे सेवा शुल्क खालीलप्रमाणे

सलेज व्हॅन	पुणे मनपा हद्द	१५० रु. (१ खेपेस)
सलेज व्हॅन	पुणे मनपा हद्दी बाहेर	४०० रु. (१ खेपेस)

सर्व नागरिकांना कळविण्यात येते कि, आपल्या आस्थापनेतील सेप्टिक टँकच्या स्वच्छतेसाठी पुणे महानगरपालिकेच्या सलेज व्हॅनचा वापर करावयाचा झाल्यास वरीलप्रमाणे सेवा शुल्क भरुन शहराच्या घनकचरा व्यवस्थापनास सहकार्य करावे.

जावक क्र. : | **स्वाक्षरी/-**
दिनांक : Seal **आयुक्त**
ठिकाण: | **पुणे महानगरपालिका**

जाहिरात क्र. १/७२२, दि. १४.११.२०१९

बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961

नोंदणीकृत कार्यालयः आकुर्डी, पुणे -४११०३५

कॉर्पोरेट कार्यालयः ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११०१४

मुदत ठेव योजना

क्रिसिल (CRISIL) कडून 'एफएए/स्टेबल' रेटिंग आणि इक्रा (ICRA) कडून 'एमएए (स्टेबल)' रेटिंग

या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

मासिक ठेव योजना (भारतीय रहिवासींसाठी)
₹५ कोटी प्रती ठेव पर्यंत वार्षिक व्याजदर (१५ नोव्हेंबर २०१९ पासून लागू) वैध आहे.

कालावधी महिन्यांमध्ये	संचयी		
	नवीन ग्राहकांसाठी	विशेष श्रेणी: जेष्ठ नागरिकांसाठी	विशेष श्रेणी: बजाज समूहाच्या कर्मचाऱ्यांसाठी, बजाज फायनान्स लि. च्या ग्राहकांसाठी किंवा बजाज आलियान्झ लाईफ इन्शुरन्स कंपनी लि. च्या विद्यमान पोलिसी धारकांसाठी
१२ - २३	८.००%	८.३५%	८.९०%
२४ - ३५	८.०५%	८.४०%	८.९५%
३६ - ६०	८.३५%	८.७०%	८.४५%

क) मासिक ठेव योजनेच्या अंतर्गत प्रत्येक ठेवीची किमान रक्कम ₹ ५०००/- असेल.
ख) हि योजना फक्त भारतीय रहिवाश्यांसाठी आहे.
ग) या योजने अंतर्गत प्रत्येक ठेव एक स्वतंत्र मुदत ठेव म्हणून समजली जाईल ज्याची प्रत्येकी वेगळी मुदत ठेव पावती असेल. प्रत्येक ठेवींचा कालावधी हा स्वतंत्र असेल.
घ) या योजने अंतर्गत प्रत्येक ग्राहक १२ ते ६० महिन्यांकरता प्रत्येक मासिक ठेवींची गुंतवणूक करु शकतात. प्रत्येक ठेवींची वेगळी मुदत ठेव पावती असेल आणि वेगळा क्रमांक असेल.
ङ) या योजने अंतर्गत ग्राहक पहिली गुंतवणूक धनादेशाने करायची आहे. त्यानंतर ६ ते ४८ गुंतवणुका ग्राहक करु शकतात.
च) प्रत्येक गुंतवणुकीच्या दिवशी जो दर चालू असेल तो त्या गुंतवणुकीला लागू होईल.
छ) या योजने अंतर्गत फक्त संचयी विकल्प आहे. व्याज हा मुद्दलेसोबत गुंतवणूक कालावधी संपल्यावर दिला जाईल.

नाव	पत्ता	व्यवसाय
श्री. राजीव बजाज	बजाज विहार कॉलनी, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५.	उद्योगपती
श्री. दिपक पोद्दार	ब्रिन कुटीर, रंगटा लेन, १७ वा मजला, नेपियन सी रोड लगत, मुंबई- ४०० ०२६.	उद्योगपती
श्री. राजन संघी	फ्लॅट क्र. २१, मिस्त्री कोर्ट, ४ था मजला, दिनशॉ वाच्छा रोड; मुंबई -४०० ०२०.	व्यवसाय
श्री. डी जे बालाजी राव	डी-१०३, आदर्श रेसिडेन्सी, ४७ क्रॉस, २ रा मेन, ८ वा ब्लॉक, जयानगर, बंगलोर -५६००८२	व्यावसायिक

बजाज फायनान्स लिमिटेडकरिता